**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेने न्यायालयीन खटल्याचे नियोजन करण्यासाठी सॉफ्टवेअर**

**मिरा-भाईंदर, २८ जानेवारी २०२५:** न्यायालयात दाखल असलेले खटले, दावे, याचिका यांचे नियोजन करून त्यात सुसुत्रता आणण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने 'लिटीगेशन मॅनेजमेंट सोल्युशन' या सॉफ्टवेअर तयार केले आहे. या सॉफ्टवेअरचे अनावरण सोमवारी, २७ जानेवारी २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांच्या हस्ते या संगणक प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

महानगरपालिकेच्या विविध विभागांविरोधात वेगवेगळे दावे, याचिका न्यायालयात दाखल असतात. त्यासाठी महापालिकेच्यावतीने विधी विभाग न्यायालयात बाजू मांडून कायदेशीर प्रकिया पूर्ण करते. परंतु, त्याची एकत्रित माहिती नसल्याने अनेक अडचणी येत असतात. त्यासाठी न्यायालयीन खटल्याचे नियोजन करण्यासाठी 'लिटीगेशन मॅनेजमेंट सोल्युशन' हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. या सॉफ्टवेअरच्या मदतीने मिरा भाईंदर महानगरपालिके विरुद्ध दाखल होणारे दावे किंवा याचिका यांची अद्यावत माहिती कार्यवाहीस्तव सोप्या पद्धतीने सर्व संबंधित विभागांना उपलब्ध होणार आहे. याशिवाय न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेस कारवाई करण्यास सोयीचे ठरणार आहे. यामध्ये मुख्यतः अतिक्रमण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग आणि इतर विभागांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांची माहिती या सॉफ्टवेअरद्वारे त्वरित उपलब्ध होणार आहे.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे, सिस्टम मॅनेजर राज घरत, प्र. सहाय्यक विधी अधिकारी प्रमोद जाधव आणि मे. इंटिग्रेटेड वेब सर्विसेस प्रा. लि. यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.